**!!Friday Film Club!!**
**Film: "BOL"**

**Date:26 Feb 2016**
**Time: 1:00 pm**
**Venue: Dept of Economics**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

द्वारा आयोजित

# फ्रायडे फिल्म क्लब

पितृसत्ताकतेचे दुटप्पी नीतिनियम, मुलाच्या जन्माशी जोडलेली सामाजिक प्रतिष्ठा आणि त्यातूनच पित्याची मुलींप्रती असलेली घृणा, घरात जन्माला आलेल्या ट्रान्सजेंडर आपत्त्याच्या अस्तित्वाला नाकारणारी मानसिकता...आणि या दुष्टचक्राला भेदून स्वअस्तित्व आणि स्वप्रतिष्ठेच्या प्रस्थापनेसाठीचा पाकिस्तानी (स्त्रीचालक) कुटुंबाचा संघर्ष दर्शविणारा...बोल.




चित्रपटाचे नाव : बोल (२०११, पाकिस्तान),
दिग्दर्शक : शोएब मन्सूर
कलाकार : हूमेमा मलिक, अतिफ अस्लम, महिरा खान, इमान अलि

दिनांक : २६ फेब्रुवारी २०१६, वेळ : दु. ०१.०० वाजता
स्थळ : अर्थशास्त्र विभागाचे सभागृह क्रं. २

फ्रायडे फिल्म क्लब
चित्रपट - बोल (2011, पाकिस्तान)
दिग्दर्शक - शोएब मन्सुर
दिनांक - २६ फेब्रु. २०१९

| नाव | विभाग | मोबाईल | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| गायकवाड नितीन | हिंदी | 7841083477 | [signature] |
| काळे रवनील | भुगोल | 7058850718 | [signature] |
| Ravindra Sanap | | 9689637121 | [signature] |
| Kayande D. R. | History | 9823665374 | [signature] |
| Chopade Bhagwat Vitthal | M.Com | 8007301176 | [signature] |
| Dandekar S. K. | M.A | 8180991075 | [signature] |
| Kadam Arii Dnyaneshwar | M.A. Politics | 7775901636 | [signature] |
| Puri Chandrakant Sunil | English dep. | 8975207661 | [signature] |
| Abhishek G. Kumre. | Journalism | 8411867938 | [signature] |
| Hashel P. Naik | Journalism | 9922291318 | [signature] |
| Rahul Kale | M.com | 9923662161 | [signature] |
| Vidyadhar Ingole | Yoga | 8806558620 | [signature] |
| Dhulgande V.D. | M.A - History | 9552845295 | Venkati |
| Muley Bhagwan | M.A. Hindi | 9545293442 | [signature] |
| Tidke Dnyaneshwar Shriram | Economics | 9822657071 | [signature] |
| Sunita Baburao Bhalerao | Journalism | 8483922946 | Bhalerao |
| Vrushali Vasant Gite | Journalism | 8380801034 | V Gite |
| Gavit Lata Kathu | Marathi | — | [signature] |
| Garole Varsha Shivdigambar | Marathi | 9970723513 | [signature] |
| Thokal Ratnamala | womens study | 9561382607 | Thokal |
| Shede Prajakta Prabhakar | English Dept | 9404210905 | [signature] |
| Chavan Satish Sundarrao | Politics | 9637341401 | [signature] |
| Kakde Rameshwar. A | History | 7875827868 | Kakde |
| Kale ganesh sammdhi | MA Hindi | 9823142343 | [signature] |
| Jitesh K. Devre | Journalism | 8237287795 | [signature] |
| Vinod B. Devare | Journlisum | 8149252735 | V Deva |

[signature]
DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

| अंक्र | नाव | विभाग | मोबाईल | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| 33) | Bharodkar Sunil Damodhar | Women Study | 9158355093 | |
| 34) | Jawale Babasaheb N. | Women Study | 9657039402 | |
| 35) | Hiwale Dhammal Baburao | M.A.I Pol.sci | 8888081255 | |
| 36) | Derkar Narayan sakharam | m.A.I English | 7083306992 | |
| 37) | shankar maroti sadar | B.A (MCJ) | 9604941867 | |
| 38) | Gautam @. zote | MA Eco | 9657466064 | |
| 39) | Deepika Himmat Pawar | Women Study | 9673296474 | |
| 40) | Dr. Savita B. Bahirat | TSWS Staff | 9371995874 | |
| | Ghule Gajanan Pandurang | Mass comm. & Jour | 9421490188 | |
| 42). | Badhavant Ratesh Yashwant | M.A. History | 9561206159 | |
| 43) | Nitin D. Wavhale | Ph.D. Economics | 9561544271 | |
| 44 | Jawale shilvanti yashwanty | M.A. मराठी | 9623527932 | |
| 45 | Ghule श्रीकांत Gajanan | M.A M.C.J | 9623460899 | |
| 46 | Kamble Rahul manik | M.A. F.Y ECO | 9604384447 | |
| 47. | Galande Shubham Umashankar | M.A. English | -"- | |
| 48 | Chat . V . S | M.A. Geo | 9049810847 | |
| 49 | Jagdale G.G | - | ~~94609~~ | |
| 50 | Vantalkar Siddharth . K | M.A. Economics | 9156900352 | |
| 51) | Funne Satish Bhagwanrao | mphil.(Eng.) | 8087575802 | |
| 52) | Munde Sachin Baburao | M.Phil. मराठी | 9545877189 | |
| | वाघमारे .वा.पि. | M.Phil मराठी | 9637904001 | |

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

दै. सकाळ

# फ्रायडे फिल्म क्लबमध्ये पाकिस्तानी 'बोल' सादर

सकाळ वृत्तसेवा 29.02.16

औरंगाबाद, ता. २८ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्रीअभ्यास केंद्रातर्फे शुक्रवारी (ता. २६) फ्रायडे फिल्म क्लब या अभिनव उपक्रमांतर्गत 'बोल' हा पाकिस्तानमध्ये दिग्दर्शित केलेला चित्रपट दाखविण्यात आला.

चित्रपटात पितृसत्ताकतेचे दुटप्पी नीतिनियम, मुलाच्या जन्माशी जोडलेली सामाजिक प्रतिष्ठा आणि त्यातूनच पित्याची मुलींप्रति असलेली घृणा दाखविण्यात आली. घरात जन्माला आलेल्या ट्रान्सजेंडर अपत्याच्या अस्तित्वाला नाकारणारी मानसिकता या दुष्टचक्राला भेदून स्वअस्तित्व आणि स्वप्रतिष्ठेच्या प्रस्थापनेसाठीचा पाकिस्तानी स्त्रीचालक कुटुंबाचा संघर्ष दर्शविणारा 'बोल'. पितृसत्ताक संरचनेतील सनातनी, मानसिक व धर्मांध विश्वासाच्या चौकटीत एक व्यक्ती म्हणून स्वातंत्र्याचे स्वावलंबी जीवन जगता यावे यासाठी लढणाऱ्या झैनाबची ही कहाणी आहे.

घरातील प्रत्येक चुकीच्या बाबींवर आवाज उठवणाऱ्या 'झैनाब' या व्यक्तिरेखेपासून सुरू होणारा हा चित्रपट समाजातील पितृसत्ताक संरचनेत निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. पुराणमतवादी मुस्लिम कुटुंबात जन्मलेल्या झैनाब हिला सहा बहिणी असतात; परंतु मुलाच्या हव्यासापोटी, घराण्याचा उत्तराधिकारी असावा म्हणून कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया न केल्याने सात-आठ मुली व बायको अशा कुटुंबाभोवती चित्रपटाचे कथानक फिरते. सदरील उपक्रमामध्ये ताराबाई शिंदे स्त्रीअभ्यास केंद्राच्या संचालक प्रा. निर्मला जाधव, डॉ. सविता बहिरट, ललित भवरे, श्यामसुंदर वैद्य, संतोष लोखंडे, विकास टाचले, संजय पोळ व विद्यार्थी उपस्थित होते.

दै. सकाळ दि. 29-02-2016

# 'बोल' चित्रपटात दाखवला स्त्रीचा संघर्ष

औरंगाबाद• डीबी स्टार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात फ्रायडे फिल्म क्लब या उपक्रमांतर्गत २६ फेब्रुवारी रोजी 'बोल' हा सिनेमा दाखवण्यात आला. हा पाकिस्तानातील सिनेमा असून त्यात एका युवतीची कथा दाखवण्यात आली आहे.

पितृसत्ताक पद्धतीत नियम, रुढी परंपरा, मुलाच्या जन्माशी जोडलेली सामाजिक प्रतिष्ठा, त्यातून मुलींना मिळणारी सापत्नतेची वागणूक, तृतीयपंथी अपत्याला नाकारणारी व्यवस्था, पाकिस्तानी स्त्रीचा संघर्ष या बोल चित्रपटात दाखवण्यात आले आहे. झैनाब या मुलीचा संघर्ष दाखवण्यात आला आहे. या वेळी केंद्राच्या संचालिका निर्मला जाधव, प्रा. सविता बहिरट, ललित भवरे, श्यामसुंदर कंटुले, संतोष लोखंडे, विकास टाचले, संजय पोळ आणि ८० विद्यार्थी उपस्थित होते.

दै दिव्य मराठी दि. 03 मार्च 2016

2015-16

दि. 01-03-2016

दै. दिव्यमराठी - दिव्यसिटी - p.2

भाष्य | ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या फिल्म क्लबमध्ये दाखवला चित्रपट

# पितृसत्ताक व्यवस्थेविरुद्ध अंतर्मुख करणारा 'बोल'

प्रतिनिधी | औरंगाबाद

संवेदनशीलता विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा केला प्रयत्न

अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणाऱ्या 'झैनाब' या व्यक्तिरेखेभोवती फिरत सामाजिक प्रश्नावर गंभीर भाष्य करणारा 'बोल' चित्रपट फिल्म क्लबमध्ये दाखवण्यात आला. ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात होणाऱ्या या उपक्रमात सामाजिक जाणिवा आणि स्त्रीबाबत समाजात असलेल्या विविध रूढी, परंपरा आणि मानसिकता यावर भाष्य करणारे चित्रपट दाखवले जातात. ८० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होते.

आजच्या युगातही मुलींना शिक्षण, जोडीदार निवडीचा अधिकार, समान संधी, बोलण्या-वागण्याचा अधिकार दिला जात नाही. हीच परिस्थिती भारतात आहे. तृतीयपंथीयांना तर जगण्याचा अधिकारही नाकारला जातो. मात्र, तृतीयपंथी म्हणून जन्माला येणे ही कुणाच्या हातची गोष्ट नाही. यावर सखोल भाष्य करणारा हा चित्रपट होता. पाकिस्तानपेक्षा निराळी स्थिती भारतीय कुटुंबांत नाही.



ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रात बोल चित्रपट पाहताना विद्यार्थी.

**असे होते कथानक** : पाकिस्तानी दिग्दर्शकाने बनवलेल्या 'बोल'मध्ये झैनाबला सहा बहिणी आहेत. मात्र, मुलगी सामाजिक प्रतिष्ठा नाही, या मानसिकतेत असलेल्या पाकिस्तानी समाजात मुलाचा जन्म हीच प्रतिष्ठा मानली जाते. सहा मुलींनंतरही पिता मुलाच्या जन्माचा घाट घालतो. मुलगा तृतीयपंथी जन्माला येतो तेव्हा बाप त्याची ओळखच नाकारतो. या सर्वांविरुद्ध झैनाब आवाज उठवते. तिच्या जिद्दीची ही कहाणी आहे. बापाच्या तुटपुंज्या कमाईत गुजारा होत नाही म्हणून सर्व मुलींना विविध कामे करून उत्पन्नाची साधने निर्माण करावी लागतात. कुटुंबासाठी अर्थार्जन केल्यावरही त्यांना अत्याचार सहन करावा लागतो. त्या निमूटपणे हे सगळे सहन करतात. पण झैनाब मात्र वाचा फोडते. मुलांइतक्याच आम्ही लायक आहोत आणि आमचीही समाजात प्रतिष्ठा आहे असे दाखवून देते. या उपक्रमात ताराबाई शिंदे अभ्यासन केंद्राच्या संचालिका निर्मला जाधव, डॉ. सविता बहिरट, ललित भवरे, श्यामसुंदर कंटुले, संतोष लोखंडे, विकास टाचले, संजय पोळ यांची उपस्थिती होती.

## चित्रपटांतून अभ्यास

चित्रपटांच्या माध्यमातून सामाजिक विषय आणि त्यांची संवेदनशीलता विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न आहे. पुस्तकी अभ्यास, व्याख्याने आणि चर्चासत्रांतून या गोष्टी नेमक्या समजावून सांगणे कठीण असते. मात्र, चित्रपटांच्या माध्यमातून हे सहज शक्य आहे. यासाठी हा उपक्रम सुरू केल्याचे केंद्र संचालिका प्रा. निर्मला जाधव यांनी सांगितले. अभ्यासक्रमातला हा तिसरा चित्रपट होता असे त्यांनी सांगितले.

Friday Film Club : Bol [26.02.2016]

